REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# पूर्व विदर्भातील मालगुजारी तलाव – एक अवलोकन



**डॉ. एस. पी. झांबरे**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एस. जायस्वाल महाविद्यालय,**
**अर्जुनी/मोर, जि. गोंदिया**

**सारांश :**

पूर्व विदर्भातील मालगुजारी तलाव हे आजवर अतिशय उपयुक्त ठरत आले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून या तलावांवर ग्रामीण भागातील लोकांचा उदरनिर्वाह चालू आहे. मात्र अनेक वर्षापासून या तलावांचे पुनरुज्जीवन न झाल्याने सिंचनक्षमतेत मोठी घट झाली आहे. या तलावांचे नूतनीकरण केल्यास सिंचन क्षमता वाढून पीक उत्पादनात मोठी वाढ होऊ शकते. प्रस्तुत लेखात पूर्व विदर्भातील मालगुजारी तलावांची संख्या, सिंचन क्षमता, अनुशेष याबद्दलचा आढावा घेण्यात आला आहे.

**कि वर्ड :** मालगुजारी तलाव, सिंचन क्षमता, अनुशेष.

## प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक मालगुजारी तलाव पूर्व विदर्भात आहेत. या विभागात गोंड राजे व इंग्रजांच्या कालावधीत सिंचनासाठी तलावांची निर्मिती करण्यात येऊन जवळपास सहा हजार मालगुजारी तलाव बांधले गेले आहेत. या विभागात भरपूर पाऊस पडतो व हे पावसाचे पाणी साठविण्यासाठी तलावांची संख्या पण भरपूर आहे. पण या तलावाकडे सद्यस्थितीत दुर्लक्ष झाल्यामुळे पाणी साठविण्याची क्षमता व दर हेक्टरी सिंचनक्षमता घटलेली आहे त्यामुळे या भागातील धान्य पिकविणारा शेतकरी वर्ग गरीबच राहिला असल्याचे दिसून येते.

विदर्भातील पश्चिम विदर्भ (अमरावती) व पूर्व विदर्भ (नागपूर) हे दोन्ही भाग शासकीय विभाग आहेत. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी नागपूर विभागांमध्ये 10.44 टक्के लोकसंख्या वास्तव करीत आहे. 1961 व 2011 च्या जनगणनेनुसार नागपूर विभागाची लोकसंख्या अनुक्रमे 46,53,440 व 1,17,36,526 होती. पन्नास वर्षाच्या कालावधीत या विभागाच्या लोकसंख्येत 152.21 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया हे जिल्हे नागपूर विभागात मोडतात. या नागपूर विभागात नागपूर जिल्हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. तर इतर जिल्हे मागासलेले आहेत.

मालगुजारी तलावांची निर्मिती शेतक–यांनी स्वतःच्या बुद्धीने, कौशल्याने व आपसातील सहकार्याने केली. विशेषतः त्या वेळच्या गोंड राज्यात कोळी समाजातील कास्तकारांना बनारसहून मुद्दाम ह्या भागात छोटे–छोटे तलाव बांधण्याकरिता आणले. चंद्रपूर, गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील बहुतांश मालगुजारी तलाव यांनीच बांधले आहेत. हे तलाव 250 ते 300 वर्षांपूर्वी बांधले गेलेले दिसतात. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत ठिकठिकाणी मालगुजार तयार झालेत व ते गावातील प्रतिष्ठित व वजनदार असल्याने ही तलावे मालगुजारांच्या मालकीची झालेली दिसतात. तलावांचे प्रमुख फायदे म्हणजे धान पिकासाठी पूरक सिंचनाची व्यवस्था, मत्स्य उत्पादन, शिंगाडे, उत्पादन आणि कमळ उत्पादन होय. तसेच गावाजवळील तलावांचा फायदा म्हणजे जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय होते. जेव्हा हे तलाव बांधण्यात आले तेव्हा या तलावाच्या पाण्यावर उसाचे पीक घेऊन गुळ उत्पादन करण्यात येत होते व त्यानंतर भाताचे पीक घेण्यास सुरवात झाली.

जगात कुठेही शेतक–यांनी स्वतःहून एवढ्या मोठ्या प्रमाणात सिंचनाच्या सोयीसाठी आणि इतर उपयोगासाठी मोठ्या संख्येत तलाव निर्माण करण्याचे उदाहरण नाही. या तलावाच्या निर्मितीची विशेषतः म्हणजे संपूर्ण तांत्रिक निकष वापरून सुनियोजित पद्धतीने आखणी करून कोठेही पाण्याचा नाश होणार नाही याचे नियोजन करून संपूर्ण तांत्रिक शास्त्र वापरून या तलावाची निर्मिती झाली आहे. या विभागातील बहुतांश तलाव गोंड राजाच्या कारकीर्दीत बांधले गेले. गोंड राजे तुकूम अनुदानाद्वारे तलाव बांधणा–या प्रत्येकाला काही वर्षाकरिता जमीन भाडे न घेता करण्यासाठी देत असत.

## मालगुजारी तलाव निर्मितीचा उद्देश :

भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर या जिल्ह्यांमध्ये भात हे प्रमुख पीक आहे. 1200 ते 1300 मी.मी. सरासरी पाऊस या भागात पडतो. भात पिकासाठी एका शेतातून दुस–या शेतात पाणी सोडण्याची पद्धत आहे. कारण भाताच्या पिकामध्ये सतत पाणी तंबून राहणे फायदेशीर आहे. धानाच्या पिकास पीक फुलो–यावर असतांना जर पावसाचे पाणी कमी पडले तर पीक जाऊ शकते म्हणून पावसाचे पाणी कमी पडेल तेव्हा तलावातून पाणी मिळावे म्हणून या तलावांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे पिकासासाठी पूरक सिंचनाची सोय असावी या उद्देशाने तलावांची निर्मिती करण्यात आली.

## तलावांची दुरूस्ती :

शासनाने तलाव ताब्यात घेण्यापूर्वी ज्या लाभधारकांना मोफत पाण्याच्या हक्क आहे अशा लाभधारकांकडून तलावांची दुरुस्ती करण्यात येत होती. नंतर मध्यप्रदेश सरकारने तलावांवर मालकी हक्क नाकारणारा कायदा मंजूर केल्यानंतर, मालगुजारी तलाव दुरुस्तीची जबाबदारी शासनाची आहे असे शेतक–यांना वाटले. परंतु शासनाने मात्र त्याबाबतीत असा आग्रह शेतक–यांकडे धरला नाही. यामुळे दुरुस्त अभावी तलावाची स्थिती बिघडत गेली. त्यामुळे तलावांवर दुरुस्तीची मागणी होऊ लागली. 1972 नंतर रोजगार हमी योजनेअंतर्गत त्या माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती होऊ लागली.

1952 झाली विदर्भातील मालगुजारी तलाव शासनाने ताब्यात घेतले, भाषावार प्रांतरचनेनंतर हे मालगुजारी तलाव महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत आले. त्यातील ज्या तलावाची क्षमता 100 हेक्टर पेक्षा जास्त होती त्यांना पाटबंधारे खात्याकडे सोपविण्यात आले व ज्यांची सिंचनक्षमता 100 हेक्टर पेक्षा कमी होती असे सर्व तलाव जिल्हा परिषदेकडे देण्यात आले. मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीकरीता राज्य सरकारच्या पाटबंधारे विभागाने 1995–1996 ते 1999–2000 असा पंचवार्षिक कार्यक्रम आखला होता. या काळात 95 कोटी रुपये खर्च करण्याची योजना सरकारला सादर केली होती.

## मालगुजारी तलावांची संख्या व अनुशेष :

स्वातंत्र्योत्तर काळात मालगुजारी तलावांकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे या तलावांची सिंचनक्षमता घटली. तसेच देखभालीचा खर्च वाढला. सध्या प्रशासनाकडे उपलब्ध आकडेवारीनुसार चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यात एकूण 5,957 माजी मालगुजारी तलाव आहेत. यात नागपूर जिल्ह्यातील 217; भंडारा जिल्ह्यातील 1,025; गोंदिया जिल्ह्यातील 1,352; चंद्रपूर जिल्ह्यातील 1,678; गडचिरोली जिल्ह्यातील 1,645 तलाव व इतर 40 तलावांचा समावेश आहे. या सर्व तलावांची एकूण सिंचनक्षमता 1,13,518 हेक्टर आहे.

दांडेकर समितीने जिल्हा स्तरावरील रब्बी समतुल्याचा दिनांक 30 जून 1982 पर्यंतचा अनुशेष महाराष्ट्र राज्यासाठी (बृहन्मुंबई वगळून) 9,24,290 हेक्टर काढला होता. त्यापैकी विदर्भाचा अनुशेष 5,27,310 हेक्टर म्हणजे जवळजवळ 57.00 टक्के होता. हा अनुशेष काढतांना दांडेकर समितीने जिल्ह्याच्या सिंचनक्षमतेत विदर्भाच्या नागपूर, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या चार जिल्ह्यात असलेल्या माजी मालगुजारी तलावाची सिंचनक्षमता ही अंतर्भूत केली आहे. वास्तविक पाहता हे तलाव बांधण्यासाठी कोणत्याही सरकारने किंवा सार्वजनिक संस्थेने खर्च केला नव्हता.

मागील अनेक वर्षात या तलावांची दुरुस्ती करण्यात आली नाही. निर्देशांक व अनुशेष समितीने या तलावांच्या दुरुस्तीकरिता व त्यावरील दाखविण्यात आलेली क्षमता पुनर्स्थापनेकरीता 117 कोटी रुपये चा अनुशेष दाखविण्यात आला. शासनाने निर्देशांक समितीचा अहवाल मान्य केला त्यामुळे या माजी मालगुजारी तलावांच्या

दुरुस्तीकरीता 1994 च्या किमतीवर आधारित 117 कोटी रुपयाच्या अनुशेषाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. नागपूर विभागातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या कार्यक्रम मागील काही वर्षात वेगवेगळया योजनेतून घेण्यात येत असला तरी या तलावाच्या दुरुस्तीकरिता लघु पाटबंधारे मंडळ, नागपूर यांनी कार्यक्रम तयार केलेला असून 2001–2002 ते 2002–2003 या वर्षात एकूण 120 कोटी 36 लाख रुपये चा कार्यक्रम तयार करण्यात आला.

1993 मधील डॉ. दांडेकर समितीचा सिंचनाचा नागपूर विभागातील अनुशेष 1,10,440 हेक्टर चा होता. त्यानंतर 1994 मध्ये आलेल्या निर्देशांक समितीने नागपूर विभागातील अनुशेष 79,471 हेक्टर इतका काढला. अलीकडे 2010 मध्ये शासनस्तरावर सिंचनाचा अनुशेष मोजण्यात आला. यानुसार नागपूर विभागात सिंचनाचा अनुशेष 1,89,200 हेक्टर इतका होता. नागपूर विभागात 28 वर्षातील सिंचनाच्या अनुशेषात वाढ झालेली दिसून येते, पूर्व विदर्भातील तलावांच्या देखभालीवर शासनाचे झालेले दुर्लक्ष व देखभालीचा खर्च वाढल्याने तलावांची सिंचन क्षमता घटली असल्याचे दिसून येते.

वर्ष 2016–2017 ते 2018–2019 या तीन आर्थिक वर्षात पूर्व विदर्भातील मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यासाठी 1,414 तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी 207 कोटी रुपयांचा प्रस्ताव विभागीय आयुक्ताने राज्यशासनाच्या मार्फत दिला. शासनाने त्यासाठी 100 कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली होती. मात्र मंजूर रक्कम खर्च झाली नाही. मालगुजारी तलाव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. मात्र इतर योजनांचे जसे होते तसेच मामा तलावांच्या बाबतीतही होत असल्याचे निदर्शनात येते.

## निष्कर्ष :

नैसर्गिकरित्या जेथे सहजपणे पाणी साठू शकते व पाणी सहजपणे पिकाला देता येते तेथेच मालगुजारी तलाव आहेत. त्यामुळे या तलावाचा पीक व मत्स्योत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. मात्र सद्यस्थितीत या तलावांची सिंचनक्षमता घटली असल्याचे दिसून येते. विदर्भात सिंचन अनुशेष शिल्लक असून तो वाढत असल्याचे दिसून येते. नव्याने बांधलेल्या मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात काही जुने मालगुजारी तलाव आहेत तलावांच्या खोलीकरण व नूतनीकरणासाठी शासन स्तरावर काही प्रयत्न चालू आहेत. मात्र त्यात आणखी वाढ करण्याची गरज आहे. बहुतांशी मालगुजारी तलाव अजूनही खोलीकरणाच्या व नूतनीकरणाच्या प्रतीक्षेत आहेत.

## संदर्भ :


1. लोकमत, 'पूर्व विदर्भातील मामा तलावांचे अस्तित्व धोक्यात' (12 डिसेंबर 2018)
2. महाराष्ट्र टाइम्स, 'पूर्व विदर्भातील तलावांचा पुनरुज्जीवनासाठी हवेत 207 कोटी' (11 मार्च 2016)
3. महाराष्ट्र शासन (1999) : 'महाराष्ट्र जल व सिंचन उपयोग'.
4. महाराष्ट्र शासन (2010) : सिंचन स्थितीदर्शक अहवाल.